महाराष्ट्र शासन
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, रायगड (मु.अलिबाग)
District Deputy Commissioner Office, Raigad- Alibag
पशुवैदयकीय सर्वचिकित्सालय इमारत, वरसोली रोड, रामनाथ-अलिबाग
Veterinary General Hospital, Building Varsoli Road, Ramnath - Alibag
पीन नं.४०२ २०१, इमेल- ddcahraigad1@gmail.com
Pin Code : 402201, Email :-ddcahraigad1@gmail.com
''पशुपक्षांच्या आजारावर घरपोच उपचार, एका कॉलच्या अंतरावर : संपर्क टोल फ्री क्रमांक-१९६२''

जा. क्रमांक: तां/द्रवानि/१५२८ /२०२४ रायगड-अलिबाग दिनांक: ३/७/२०२४

## -: दरपत्रक सूचना : -

जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, रायगड- अलिबाग हे इच्छुक संस्था, परिवहन ठेकेदाराकडून खालीलप्रमाणे द्रवनत्र व रेतमात्रा वाहतूक करण्यासाठी एक वर्षाच्या कालावधीकरिता विहित नमुन्यात दरपत्रक मागवीत आहेत. **(सोबत विहित नमुना जोडला आहे.)**

वाहतुकीची व्याप्ती खालीलप्रमाणे आहे:

१. जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, पेण जि. रायगड या संस्थेच्या गोडाउनमधून वीर्यमात्रा व भरलेली द्रवनत्र पात्रे वाहनात भरून गरजेप्रमाणे रायगड जिल्हातील १२२पशुवैद्यकीय संस्थाना प्रत्येक वाहतूक मार्गावरील (अलिबाग, पनवेल, महाड मार्ग ) (अंदाजे५५० कि. मी.प्रति मार्ग) कृत्रिम रेतन उपकेंद्रांना महिन्यातून एकदा पुरवठा करण्यासाठी क्षमता असलेल्या वाहनातून पोहचविणे जरुरीचे आहे.
२. जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, पेण जिल्हा रायगड येथून कृत्रिम रेतन उपकेंद्रांना द्रवनत्र पोहच करून रिकामी द्रवनत्रपात्रे परत आणणेसाठी एकाच वेळी साधारणता ४० द्रवनत्र पात्रे (प्रत्येकी ५१.५ लिटर) वहन क्षमता असलेले वाहन असणे आवश्यक राहील.
३. द्रवनत्राचा पुरवठा करताना मुक्कामासाठी थांबावे लागणार आहे त्यासाठी ज्यादा आकार मिळणार नाही असे गृहीत धरून प्रती किलोमीटरचा दर देण्यात यावा.
४. इच्छुक संस्था व परिवहन ठेकेदारांनी दरपत्रके सादर करताना GST क्रमांक देणे बंधनकारक राहील. GST क्रमांक नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक असलेल्या निविदाकाराच्या लेटरहेडवर दरपत्रक सादर करावीत व पॅनकार्ड ची प्रत सोबत जोडावी.
५. दरपत्रकाचा नमूना, त्याचे नियम व अटी शर्ती बाबतचा तपशील ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून दिनांक १७/०७/२०२५ अखेर जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जि. रायगड – अलिबाग यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सुट्टीचा दिवस सोडून स्वीकारली जातील . दरपत्रके दिनांक १८/०७/२०२५ रोजी दुपारी १२.०० मा. जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन, रायगड- अलिबाग यांच्या कार्यालयात खरेदी समितीच्या समोर उघडण्यात येतील.

सदर खरेदी प्रक्रियेअंती फक्त पात्र निविदाकारांनी सादर केलेल्या किंमतीच्या दरपत्रके विचारात घेऊन सर्वात कमी दर सादर करणाऱ्या निविदाकाराची निवड करण्यात येईल. निवड करण्यात आलेल्या निविदाकाराने जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन, रायगड- अलिबाग यांचेशी दर मंजूर झाले दिनांकापासून एक वर्षाचा करार करून रुपये १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) ची बँक ग्यारंटी देणे आवश्यक राहील.

कोणतेही कारण न देता दरपत्रक स्वीकारणे अथवा नाकारणे वा रद्द करण्याचे अधिकार खरेदी समितीने राखून ठेवले आहेत

दरपत्रक सादर करते वेळी जोडावयाची कागदपत्रे

विहित नमुन्यातील दरपत्रकासाठी विहित नमुना

१. पॅन कार्ड, आधार कार्ड
२. वाहनाचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र( आर सी बुक )
३. वाहनाचे फिटनेस प्रमाणपत्र व पी यू सी प्रमाणपत्र
४. गुडस कॅरिअर परमिट
५. वाहनाचा विमा रक्कम भरल्याची पावती
६. वाहन चालवण्याचा परवाना
७. अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे स्वतःच्या सहीचे हमीपत्र

Scanned with OKEN Scanner

( दरपत्रकासाठी विहित नमुना )

दि.

प्रति,

मा. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त
रायगड -अलिबाग

विषय: द्रवनत्र व रेतमात्रा वाहतुकीसाठी दरपत्रके मागविणे बाबत....
संदर्भ: रायगड जिल्हा संकेत स्थळावर दिनांक ९/७/२०२५ रोजी प्रसिद्ध
झालेली दरपत्रक सुचना

महोदय,

संदर्भांकित दरपत्रक सूचनेस अनुसरून द्रवनत्र व रेतमात्रा वाहतुकीसाठी मी खाली दर्शविल्याप्रमाणे दर नमूद करून दरपत्रक सादर करीत आहे.

(१) द्रवनत्र व रेतमात्रा वाहतुकीच्या निविदेसंबंधी आवश्यक कागदपत्रे सोबत जोडण्यात आलेली आहे.
(२) मी हमी देतो की, माझा खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर हितसंबंधाचा संघर्ष नाही.
(३) मी हमी देतो की, मी एकल दरपत्रक सादर करीत आहे.

तपशील

१ दरपत्रक संदर्भ व तारीख: जिल्ह्याच्या व खात्याच्या संकेत स्थळावर दिनांक ९/७/२०२५ रोजी प्रसिद्ध झालेली दरपत्रक सूचना
२ दरपत्रक सादर करण्याची अंतिम तारीख - दिनांक १७/ ०७/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजे पर्यन्त
३ दरपत्रक सादर करण्याचे ठिकाण - मा. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त जि .रायगड यांचे कार्यालय
४ दरपत्रक उघडण्याची अंतिम तारीख - दिनांक १८/०७/२०२५ दुपारी १२.०० वाजता
५ दरपत्रक उघडण्याचे ठिकाण -मा .जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन, रायगड-अलिबाग
६ निविदा पत्रातील दर लागू राहण्याची अंतिम तारीख -दरपत्रक मंजूर झाले दिनांकापासून एका वर्षाकरिता अथवा पुढील निविदा मंजूर होईपर्यंत

वाहतुकीचे दरपत्रक

| तपशील | वाहतुकीचा दर प्रति कि.मी. |
| --- | --- |
| अटी व शर्तीमध्ये नमूद केल्याप्रमाणे द्रवनत्र व रेतमात्रा वाहतूक करणे | |

वरील वाहतुकीचे मुख्यालय जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, पेण जि. रायगड येथे राहील.

नाव ठळक अक्षरात:

पूर्ण पत्ता:

दिनांक

आपला विश्वासू

नाव व स्वाक्षरी

सोबत जोडलेली स्वसाक्षांकित कागदपत्रे

१)पॅन कार्ड, आधार कार्ड
२)वाहनाचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र( आर सी बुक )
३)वाहनाचे फिटनेस प्रमाणपत्र
४)गुडस कॅरिअर परमिट
५)वाहनाचा विमा रक्कम भरल्याची पावती
६)वाहन चालवण्याचा परवाना
७)अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे स्वतःच्या सहीचे हमीपत्र

Scanned with OKEN Scanner

## -: द्रवनत्र व रेतमात्रा वाहतुकीचे दरपत्रक अटी व शर्ती :-

जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, रायगड-अलिबाग यांचे अधिनस्त असलेल्या जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, पेण जिल्हा रायगड येथील कार्यालयातील गोडाउनमधून गरजेप्रमाणे रायगड जिल्हातील प्रत्येक वाहतूक मार्गावरील कृत्रिम रेतन उपकेंद्रांना महिन्यातून एकदा द्रवनत्र व रेतमात्रा इत्यादीची वाहतूक करणेसाठी एका वर्षाच्या कालावधीकरिता खाजगी वाहतूक करणाऱ्या ठेकेदारांकडून मोहरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

**आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे आहेत.**

अ. दरपत्रक सादर करणाऱ्या निविदाकाराने खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छुक संस्थेने एकल निविदा देण्याबाबत निविदाकारांची हमी देणे आवश्यक.

ब. दरपत्रक सादर करणाऱ्या निविदाकाराने दरपत्रकासाठी नमूद केलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे स्वतःच्या सहीचे हमीपत्र

क. वाहतुकीसाठी वाहन स्वतःच्या मालकीचे असावे व त्यासोबत आर. सी. बूक, वाहनाचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, पॅन कार्ड, **वाहनाचे फिटनेस प्रमाणपत्र, गुडस कॅरिअर परमिट, वाहनाचा विमा रक्कम भरल्याची पावती, वाहन चालवण्याचा परवाना** सादर करणे आवश्यक राहील.

वरील सर्व नमूद केलेल्या कागदपत्रांपैकी जी प्रमाणपत्रे निविदाधारकाने सादर केली असतील ती साक्षांकीत/प्रमाणित केलेली असणे आवश्यक आहे.

**सर्वसाधारण माहिती व अटी शर्ती:**

**खालील नियम व अटींची ठेकेदारांनी नोंद घ्यावी**

१. जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, पेण , जि. रायगड या कार्यालयाच्या गोडाउन मधून गरजेप्रमाणे वीर्यमात्रा व द्रवनत्र, द्रवनत्र पात्रात भरून जिल्ह्यातील प्रत्येक वाहतूक मार्गावर (अंदाजे सरासरी किमान ३५० कि. मी. प्रति मार्ग ) एकूण 122 कृत्रिम रेतन उपकेंद्रांना दरमहा पुरवठा करावयाचा आहे. त्याप्रमाणे प्रत्येक फेरीच्या वेळी लेखी माहिती घेवून जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, पेण येथून भरलेली द्रवनत्र पात्र घेणे व उपकेंद्रावरील रिकामी पात्रे सुस्थितीत परत मुळ ठिकाणी आणणे ही सर्व कामे ठेकेदाराने बिनचुक करावयाची आहेत. द्रवनत्रपात्राची चढउतार करणे या कामासाठी वाहनचालकासोबत दोन कर्मचारी ठेवणे जरुरीचे आहे. जर वाहन चालक स्वतः या कामी मदतनीस असेल तर एक कर्मचारी ठेवून काम करण्यास मुभा राहील. त्यासाठी कोणताही सरकारी कर्मचारी मदत करणार नाही.

२. बिलाची रक्कम अथवा इंधनासाठी आगाऊ धनराशी दिली जाणार नाही.

३. पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, पेण जि. रायगड यांनी ठरवून दिलेल्या दिवशी व वेळेत ठरलेल्या मार्गावर पुरवठयाच्या कार्यक्रमानुसार भावबंद कराराचे वाहन उपलब्ध करुन त्याप्रमाणे वाहतूक करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. तसेच अतिरीक्त वाहन लागल्यास ज्यादा वाहन पुरवठयासाठी उपलब्ध करून द्यावे लागेल. दरकराराचे वाहन उपलब्ध नसल्यास पर्यायी व्यवस्था ठेकेदाराला करावी लागेल. तसे न केल्यास या कार्यालयाकडून पर्यायी व्यवस्था केली जाईल व त्यासाठी झालेला ज्यादा खर्च ठेकेदाराकडून वसूल केला जाईल. तसेच रुपये ५००/- (रुपये पाचशे मात्र) त्या दिवशीच्या फेरीसाठी दंड म्हणून वसूल केले जातील. सदर वसूली त्यांचे बिलातून किंवा सुरक्षा रकमेतून केली जाईल.

४. जिल्हा कृत्रिम रेतन केंद्राचा प्रतिनिधी वाहनासोबत वाहतूकीचे वेळी राहील व कामकाजाबाबत त्याच्या सुचना ठेकेदारांच्या वाहन चालकास पाळाव्या लागतील.

५. जर काही कारणाने ठरलेल्या दिवशी व वेळेला द्रवनत्रपात्र पाठविणे शक्य झाले नाही, तर ठेकेदारास त्यासाठी कोणताही मोबदला दिला जाणार नाही. त्यामुळे सदर दिवशीचे वाहतूकीचे काम जेव्हा करावयाचे त्याचे लेखी/तोंडी माहिती घेऊन त्याप्रमाणे वाहतूक करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

६. ठेकेदाराने वाहतुकीचे दर प्रति किलोमीटर प्रमाणे द्यावयाचे आहेत व वाहतूक केल्यानंतर त्याबाबतचे देयक योग्यप्रकारे देण्याची जबाबदारी ठेकेदारची राहील. असे देयक मंजूरी नंतर मा. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, रायगड-अलिबाग या वरिष्ठ कार्यालयाकडून अदा करण्यात येईल.

७. वाहनाच्या तळावर जाड कॉपर/ फोम मॅटींग असणे आवश्यक आहे. ऊन, वारा व पाऊस यापासून द्रवनत्र पात्रांचे संरक्षण होण्यासाठी वाहनावर ताडपत्री/पत्र्यांचे छत असणे आवश्यक आहे.

8/7/25

Scanned with OKEN Scanner

८. ठेकेदार हा द्रवनत्र व द्रवनत्र पात्रे ताब्यात मिळल्यापासून परत रिकामी पात्रे केंद्रातील कर्मचाऱ्याच्या ताब्यात देईपर्यंत द्रवनत्र व द्रवनत्र पात्रांच्या होणाऱ्या नुकसानीस जबाबदार राहील. नैसर्गिकरित्या होणाऱ्या द्रवनत्राच्या घटीस ठेकेदार जबाबदार राहणार नाही. परंतु वाहनाच्या झालेल्या नुकसानीस व बरोबर असलेल्या ठेकेदारचे प्रतींनिधींना काही इजा झाल्यास किंवा त्यांच्याकडून झालेल्या गैरवर्तवणुकीमुळे शासनाचे काही नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

९. जेव्हा वाहन या केंद्राच्या कामासाठी वापरात असेल, तेव्हा इतर कोणतेही प्रवासी व सामानाची त्या वाहनांतून वाहतूक करता येणार नाही. या अटीचे उल्लंघन झाल्यास त्या दिवशीच्या वाहतुकीचे बिल अदा केले जाणार नाही.

१०. जेव्हा वाहन या केंद्राच्या कामासाठी वापरत असेल. तेव्हा वाहन चालक हा वाहन चालविण्यास अनुभवी किंवा किमान ३ वर्षे संबंधीत प्रकारचे वाहन चालविण्याचा परवानाधारक असला पाहिजे. वाहन चालवताना परवाना व इतर संबधीत कागदपत्रे वाहनधारकाकडे मागणी केल्यास केव्हाही पाहण्यास उपलब्ध असली पाहिजेत.

११. सर्व उपकेंद्राना द्रवनत्र त्या केंद्रात नेवून पुरवठा करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. जर वाहन केंद्रापर्यंत जात नसेल तर जेथे वाहन जाईल तेथून द्रवनत्र पात्राची वाहतूक मनुष्यबळाने करावी लागेल. जर ठेकेदाराचे कर्मचारी या कामी कसूर करतील तर त्यासाठी झालेला खर्च ठेकेदाराच्या बिलातून वसूल करण्यात येईल.

१२. द्रवनत्र वाहतुकीसाठी वाहन 407 अथवा त्या क्षमतेचे असावे व प्रत्येक मार्गावर वाहतूक करण्यासाठी TA55 ची ३५ ते ४० मोठी द्रवनत्र पात्रे मावतील अशी व्यवस्था असणे आवश्यक आहे. त्यासाठी सागवाणी फळयांचे मजबूत पार्टीशन टाकणे आवश्यक आहे.

१३. वाहतूकीचे काम समाधानकारक करण्यात येत नसल्याचे व आदेशाचे पालन होत नसल्याचे आढळल्यास मा. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, रायगड-अलिबाग यांना सदरचा करार केव्हाही कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार राहील व त्यास अशा वेळी भरलेली सुरक्षा रक्कम शासनाला कायमची जमा करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

१४. गाडीच्या ठेकेदाराने वाहतूकीच्या वेळेला लागणारे पुरेसे इंधन व खर्चासाठीची संपूर्ण व्यवस्था करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१५. वाहतुकीच्या भावबंद कराराचा कालावधी दरपत्रक मंजूर झालेच्या दिनांकापासून एक वर्ष असा राहील परंतू नवा करार त्यापुर्वी न झाल्यास, वाहतुकीच्या कराराची मुदत संपल्यानंतर नवीन निविदा मंजूर होईपर्यंत पहिल्याच दराने व नियमाच्या अधीन राहून द्रवनत्र व इतर साहित्याची वाहतूक करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. कारण ही अत्यावश्यक सेवेतील बाब आहे.

१६. मुद्दा क्रमांक १५ च्या अनुषंगाने जर शासनाचे /मंडळाचे वाहन उपलब्ध झाल्यास त्याने वाहतूक करण्याच्या अधिकार या कार्यालयास राहील व त्यास ठेकेदाराकडून कोणत्याही प्रकारचा प्रत्यवाह राहणार नाही तसेच ठेकेदारास वाहतुकीस आडकाठी करता येणार नाही.

१७. करारबाबतचे व कामाबाबतचे कोणतेही मतभेदाबाबत मा. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, रायगड-अलिबाग यांचा निर्णय ठेकेदारावर बंधनकारक राहील व तो निर्णय अंतिम राहील.

१८. प्रत्यक्ष झालेल्या वाहतूकीप्रमाणे देयक अदा करण्यात येईल.

१९. मुक्कामच्या ठिकाणी वाहनात असलेल्या शासकीय मालमत्तेचे रक्षण करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील अन्यथा शासनाचे मालमत्तेचे नुकसान झाल्यास ठेकेदारास त्याची संपूर्ण भरपाई करुन द्यावी लागेल.

२०. वाहतूक करीत असताना ठेकेदाराने कोणत्याही प्रकारचा वाहन परिवहन किंवा पोलीस खात्याचा कायदाविषयक नियमांचे उल्लंघन केल्यास होणाऱ्या नुकसानीची संपूर्ण जबाबदारी ठेकेदारावर राहील.

२१. वाहन जप्त झाल्यास खोळंबून राहिलेल्या उर्वरित कामास दुसरे पर्यायी वाहन उपलब्ध करून देणे ठेकेदारवर बंधनकारक राहील.

२२. डिझेल, पेट्रोल, व इंधन दरात दरवाढ झाल्यास अथवा इतर कोणत्याही कारणास्तव कराराच्या कालावधीमध्ये दर वाढवून दिले जाणार नाही, तसेच वाहतूक करीत असताना टोल नाका शुल्क, इतर पथकर वा कोणतेही वाहतूक शुल्क वगैरे सर्व कर देणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

२३. पशुसंवर्धन खात्याच्या इतर कार्यालयाने मागणी केल्यास भावबंध कराराचे वाहन उपलब्ध करून द्यावे लागेल व मंजूर दरानुसार सदर कार्यालयाकडून बिल अदा करण्यात येईल.

२४. अटी व शर्ती नुसार सादर केलेल्या व परिपूर्ण नसलेल्या तसेच नियोजित तारीख व वेळेनंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२५. द्रवनत्र पुरवठा करते वेळी वाहन चालवताना ठेकेदाराचे कर्मचारी यांनी नशापान करू नये

8/7/25

Scanned with OKEN Scanner

२६. ज्या ठेकेदाराचे दरपत्रक मंजूर होईल त्यास २०० रूपयाच्या बॉन्ड पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल व रुपये १०,०००/- (अक्षरी दहा हजार मात्र) ची मा. जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन, रायगड-अलिबाग यांचे नावे बँक ग्यारंटी द्यावी लागेल. दरपत्रक मंजूर झाल्याचे या कार्यालयाचे पत्र पोहचताच आठ दिवसाच्या आत अशी कार्यवाही न झाल्यास कोणतीही सूचना न देता त्याच दराने वाहतूक कर-ण्यास इच्छुक अन्य ठेकेदारांपैकी दुसऱ्या ठेकेदारास मंजूरी देण्यात येईल व त्याबद्दल कोणतीही तक्रार मंजूर करण्यात येणार नाही.

२७. दरपत्रक मंजूर झालेल्या ठेकेदाराकडून त्याच्या बिलामधून शासकीय नियमाप्रमाणे २ % TDS व GST कपात केला जाईल.

२८. दर निश्चित करीत असताना जर दोन किंवा तीन ठेकेदाराचे सारखे दर आले तर वाहन, वाहनाचा प्रकार, वाहतूक करण्याची क्षमता पाहून खरेदी समिती अंतिम निर्णय घेईल व तो निर्णय सर्वांना बंधनकारक राहील.

२९. कोणतेही कारण न देता दरपत्रक स्वीकारणे अथवा नाकारणे वा रद्द करण्याचे अधिकार खरेदी समितीने राखून ठेवले आहेत.

३०. सध्याच्या द्रवनत्र रूट मार्गात तसेच मुक्कामात शासकीय काटकसरीच्या धोरणाप्रमाणे बदल वाढ, कमी केल्यास त्याप्रमाणे ठेकेदारास अंबलबजावणी करावी लागेल.

३१. एकदा ठरवून दिलेल्या वाहतुकीच्या दरात कोणत्याही कारणाने वाढ करण्यात येणार नाही.

उपरोक्त अटी व शर्ती मला मान्य आहेत.

पुरवठा दाराचे नाव व स्वाक्षरी

8/7/25